## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार कमांक ०७ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :

माझे नाव : प्रशांत भरत शिंदे
माझे वय : २८ वर्षे,
व्यवसाय : शेती,
राहणार : कळंब, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. एस. आर. पाचारणे यांचे मार्फत

**१.** या प्रकरणतील घटना सन २०१० मध्ये घडली होती. शशिकांत रामकर यांनी त्यांच्या मुलासाठी व पुतण्यासाठी संजय बनकर यांच्याकडे लिपीक पदासाठी दीड लाख रूपये व खलाशी पदासाठी सव्वा लाख रूपये भरल्याचे शशिकात रामकर हे आमच्या घरी आले त्यावेळेस त्यांनी माझे वडिलांना सांगितले होते. तसेच शशिकांत रामकर यांनी संजय बनकर हे रेल्वेमध्ये नोकरी लावण्याचे काम करतात याबाबत सुध्दा माझे वडिलांना सांगितले होते. संजय बनकर हे माझे चांगल्या ओळखीचे आहेत व रेल्वेमधील नोकरीसाठी दोन तीन जागा शिल्लक असल्याने तुम्ही तुमच्या मुलासाठी प्रयत्न करा असे शशिकांत रामकर यांनी माझे वडिलांना सांगितले होते. त्यानंतर काही दिवसांनी संजय बनकर माझे घरी आले होते. त्यावेळेस संजय बनकर यांनी तीन चार जागा शिल्लक आहेत तुम्ही दीड लाख रूपयांची जुळवाजुळव करा असे माझे वडिलांना माझेसमक्ष साांगितले होते. त्यानंतर एकेदिवशी संजय बनकर यांचा माझे वडिलांना फोन आला व त्यांनी माझे वडिलांना विचारणा केली की पैशाची जुळवाजुळव झाली आहे का. त्यावर माझे वडिलांनी पैशांची जुळवाजुळव झाली असल्याचे संजय बनकर यांना सांगितल्यावर दुस—या दिवशी संजय बनकर पैसे नेण्यासाठी माझे घरी आले असताना माझे वडिलांनी संजय बनकर यांना माझेसमक्ष दीड लाख रूपये रोख रक्कम दिली. त्याच दिवशी संजय बनकर हे मला व माझे वडिलांना ओमनी चारचाकीने मुंबई येथील मांटुगामध्ये सिमा मोहितकर हिच्याकडे घेवून आले. त्यानंतर संजय बनकर यांनी आमच्यासमक्ष सिमा मोहितकर यांना पैसे दिले. सिमा मोहितकर यांनी पैसे मिळाल्याचे आम्हांला शंभर रूपयाच्या

स्टॅम्प पेपरवर लिहुन दिले. सदर स्टॅम्प पेपरची मूळ प्रत भोर नावाच्या व्यक्तीला देण्यात आली होती व छायांकित प्रत मला देण्यात आली होती. आता मल स्टॅम्प पेपरची छायांकित प्रत दाखविण्यात आली. त्यावर सिमा मोहितकर हिची सही आहे. तिने तिची सही माझेसमक्ष केली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्या छायांकित प्रतला **वस्तूचिन्ह अ** देण्यात येते. सिमा मोहितकर यांनी तुम्हांला दोन ते तीन महिन्यांत नोकरीचा कॉल येवून जाईल अशी आम्हांला खात्री दिली होती. दोन ते तीन महिन्यानंतर परत सिमा मोहितकर यांना कॉल केल्यानंतर त्यांनी काम होईल अशी शाश्वती दिली होती. त्यानंतर सिमा मोहितकर यांचा कॉल न आल्यामुळे मी आणि माझे वडील परत माटुंगा येथे सिमा मोहितकर यांच्याकडे गेलो असताना त्यावेळेस सुध्दा सिमा मोहितकर यांनी आम्हांला काम होईल व तुम्हांला नोकरीचा कॉल येईल याची खात्री दिली होती. त्यानंतर काही दिवसांनी परत संजय बनकर यांना फोन केला असता त्यांनी सुध्दा काम होईल अशी खात्री दिली व परत कोणी पैसे भरणार असेल तर सांगता असे आम्हांला सांगितले होते. त्यानंतर कुणाचाच कॉल न आल्यामुळे मी आणि माझे वडील परत मांटुगा येथे सिमा मोहितकर हिच्या घरी गेलो असता तिच्या घराला कुलुप लावल्याचे दिसून आले. त्यानंतर आमच्या लक्षात आले की नोकरी लावण्याचे अमीष दाखवून आमच्याकडून पैसे उकळल्याने आमची फसवणुक झाल्याचे आमच्या लक्षात आल्याने मंचर पोलिस स्टेशन येथे तक्रार नोंदविली. आम्ही सगळे तक्रार दयायला मंचर पोलिस स्टेशनला गेलो होतो. आमच्या सगळयांच्या वतीने संदीप भगवान दळवी याने संजय बनकर व सिमा मोहितकर यांच्याविरूध्द मंचर पोलिस स्टेशनला तक्रार नोंदविली. आम्ही सर्वांनी पोलिसांना घटनेबाबत जबाब दिला. संजय बनकर याला मी चांगल्या प्रकारे ओळखतो व सिमा मोहितकर हिला सुध्दा चांगलया प्रकारे ओळखतो. संजय बनकर व सिमा मोहितकर यांना बघितले तर मी ओळखू शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर नाही.

(आरोपी संजय बनकर गैरहजेरी माफीचा अर्ज निशाणी क्र. ३९ वर दिलेला असून तो मंजूर करण्यात आला आहे व आरोपी सिमा मोहितकर हिच्याविरूध्द २९९ प्रमाणे खटला चालविण्यात आलेला आहे.)

## उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एन. चासकर यांचे मार्फत.

२. माझे शिक्षण डी.फार्म पर्यंत झालेले आहे. शशिकांत रामकर हे माझे घरापासून एक ते दीड किलोमीटर अंतरावर राहतात. पोलिसांनी माझे

सांगण्यानुसार माझा जबाब नोंदविलेला आहे व मी माझा पोलिसांना दिलेला जबाब वाचला होता. संजय बनकर माझे घरी येवून तीन चार जाागा शिल्लक आहेत पैशांची जुळवाजुळव करा असे माझे वडिलांना माझेसमक्ष संजय बनकर याने सांगितल्याची बाब मी पोलिसांना जबाब देताना सांगितली नव्हती. माझे वडिलानां माझेसमक्ष संजय बनकर याला दीड लाख रूपये रोख रक्कम दिली ही बाब पोलिसांना मी जबाब देताना सांगितली होती. सदरची बाब माझे जबाबात का नमूद नाही याबददलचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील शेती करतात. हे म्हणणे खरे आहे की शशिकांत नारायण रामकर हे माझे गावातील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की शशिकांत रामकर यांनीच मला रेल्वेमधील नोकरीबाबत व त्यासाठी लागणा—या पैशांबाबत मला व माझे वडिलांना घरी येवून माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ०२.०६.२०१० रोजी शशिकांत रामकर माझे घरी आले होते. हे म्हणणे खरे आहे की शशिकांत रामकरयांनी माझे घरी येवून सांगितले की रेल्वेमध्ये खलाशी व लिपीक पदाची भरती आहे. हे म्हणणे खरे आहे की रेल्वेमधील लिपीक पदासाठी व खलाशी पदासाठी संजय बनकर व रेल्वेमधील लिपीक सिमा मोहितकर हे पैसे घेवून काम करून देतात असे आम्हांला शशिकांत रामकर यांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की कामाची पूर्ण खात्री आहे, मी माझे मुलाकरीता व पुतण्याकरीता ११.०५. २०१० रोजी लिपीक पदासाठी दीड लाख रूपये व खलाशी पदासाठी सव्वा लाख रूपये भरलेलेल आहेत असे आम्हांला शशिकांत रामकर यांनी आमच्या घरी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की संदीप दळवी व अभिषेक देवीदास कवडे यांनी सुध्दा लिपीक पदासाठी प्रत्येकी दीड लाख रूपये भरल्याचे शशिकांत रामकर यांनी आम्हांला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की पैसे भरल्याचे व पैसे मिळाल्याचे सिमा मोहितकर हिने स्टॅम्प पेपरवर लिहुन दिलेले आहे असे सुध्दा शशिकांत रामकर यांनी आम्हांला आमच्या घरी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की लिपीक पदासाठी बारावी उत्तीर्ण उमेदवार लागतो व त्या पदासाठी तीन जागा शिल्लक आहे असे सुध्दा शशिकांत रामकर यांनी आम्हांला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की तुमचा मुलगा बारावी पास आहे तुमच्या मुलाचे काम होईल तुम्ही लवकर पैसे भरा असे सुध्दा शशिकांत रामकर यांनी आम्हांला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळेस पैसे जमा झाल्यानंतर मी तुम्हांला सांगतो असे माझे वडिलांनी शशिकांत रामकर

यांना म्हटले होते.

**४.** हे म्हणणे खरे आहे की शशिकांत रामकर हा आमचया गावचा व ओळखीचा असल्यामुळे रेल्वेसाठी संपूर्ण पैसे भरण्याचा विश्वास आमचा शशिकांत रामकर याच्यावर होता. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ०५.०६.२०१० पर्यंत माझी आणि संजय बनकर यांची कोणतीही ओळख नव्हती. ज्या ओमनी गाडीने आम्ही मुंबईला गेलो होतो त्या ओमनी गाडीचा नोंदणीकृत क्रमांक आणि चालकाचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्या माणसाला आपण पैसे देतो तोच माणूस आपल्याला पैसे मिळाल्याची पोच देतो. हे म्हणणे खरे आहे की पैसे मिळाल्याची आणि काम होण्याची खात्रीची पोच आम्हांला सिमा मोहितकर हिने स्टॅम्प पेपरवर लिहुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की ज्यास्टॅम्प पेपरवर सिमा मोहितकर हिने आम्हांला पोच दिली होती तो स्टॅम्प पेपर सुध्दा सिमा मोहितकर हिने तिच्या नावाने स्वत: लिहुन आणला होता व तिने तिच्या हस्ताक्षरात स्टॅम्प पेपर लिहुन दिले होते. सिमा मोहितकर ने स्टॅम्प लिहु देईपर्यंत आम्ही सिमा मोहितकर हिची कोणत्याही प्रकारे चौकशी केली नव्हती व तिच्या कुटुंबाची व तिची वैयक्तिक चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की शशिंकात रामकरने सांगितल्याप्रमाणे आमळी शशिकांत रामकर याच्यासोबत मुंबईला जावून शशिकांत रामकर च्या सांगण्यानुसारच सिमा मोहितकर हिला पैसे दिले व सिमा मोहितकर हिने आम्हांला त्याची पोच दिली होती.

प्रश्न: शशिकांत रामकर यांच्या म्हणण्यानुसारच तुम्ही पैसे भरले होते.
उत्तर:शशिकांत रामकर व संजय बनकर यांचया म्हणण्यानुसार आम्ही पैसे भरले होते.

**६.** हे म्हणणे खरे नाही की काम झाले नाही म्हणून आम्ही शशिकांत रामकर यांना कधीही विचारणा केली नाही. दिनांक ०६.०६.२०१० पूर्वी आम्ही संजय बनकर यांची कोणत्याही प्रकारे चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की रेल्वे भरती ही केंद्र सरकारच्या अखत्यारित येते. हे म्हणणे खरे आहे की रेल्वे भरतीची जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिध्द होते. रेल्वेभरतीसाठी लेखी किंवा ऑनलाईन असा कोणत्याही प्रकारचा फॉर्म मी भरला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की संजय बनकर माझे घरी आला व आम्ही त्याला पैसे दिले हे दाखविण्यासाठी माझेकडे कोणताही लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे

नाही की मी आणि शशिकांत रामकर मुंबईला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की शशिकांत रामकर हा सिमा मोहितकर हिचा रेल्वे मध्ये काम लावून देण्यासाठी अभिकर्ता एजंट म्हणून काम करायचा. हे म्हणणे खरे नाही की शशिकांत रामकर व मी एकाच गावचा असल्यामुळे आरोपीचे खोटे नाव या गुन्हयात गोवलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की संजय बनकर हा केव्हाही माझे घरी आला नव्हता व कधीही आम्हांला घेवून मुंबईला गेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की शशिकांत रामकर याला वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर मी खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : १२/०२/२०२० (एन. डी. मेश्राम)
घोडेगाव प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव